महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ११४ वा | दिनांक : २९/०१/२०२५ | वार : बुधवार

# सरकारला सल्ला देऊ नका, आमच्यात नैतिकता - अजित पवार



**बीड :** बीड हत्या प्रकरणात कुणाचा संबंध असेल तर त्याच्यावर नक्की कारवाई करू. या संदर्भात चौकशी सुरू आहे. त्यात दोषी आढळल्यास कारवाई करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे. सध्या माध्यमांतून मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनामाची मागणीची चर्चा सुरु आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही माझ्याकडे काही कागदपत्रे दिली आहेत. त्यात तथ्य आढळल्यास कारवाई नक्की करणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

या माध्यमातून मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या चर्चेवर पडदा टाकण्याचा प्रयत्न अजित पवार यांनी केला आहे. जो दोषी असेल त्याला पाठीशी घातले जाणार नाही. त्याच्यावर कारवाई होईलच, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. आणि जर कोणाचा संबंध नसेल तर कारवाईचा प्रश्नच येत नाही, असे देखील अजित पवार यांनी स्पष्ट केले.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी काही कागदपत्र माझ्याकडे दिली आहेत. मी ती कागदपत्र पाहिली आहेत. ती कागदपत्र तपासणीसाठी मी संबंधित यंत्रणांना दिली आहे. त्यामध्ये काही दोष आढळला तर त्याच्यावर नक्कीच कारवाई होईल, असे देखील पवार यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री अजित पवार गुरुवारी ३० जानेवारी रोजी बीड जिल्ह्यात जाणार आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून ते डीपीडीसीची बैठक घेणार आहेत. या विषयी देखील त्यांनी माहिती दिली.

महायुतीमधील सर्व वरीष्ठ नेत्यांशी मी संपर्कात आहे. त्यामुळे खालचे कार्यकर्ते काय बोलतात, त्यावर उत्तर देण्यास मी बांधील नसल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. आमच्या सरकारला इतरांनी कोणीही सल्ला देऊ नये. महायुती सरकारमध्ये नैतिकता आहे, असा दावा देखील अजित पवार यांनी केला आहे. नैतिकतेच्या मुद्द्यावर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी वारंवार मागणी होत आहे. या मागणीला अजित पवार यांनी फेटाळले आहे. निर्दोष व्यक्तीवर कोणत्याही परिस्थितीत कारवाई व्हायला नको, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे.

भारतीय जनता पक्षाच्या ज्यांना मी नेते समजतो, त्या सर्वांशी माझी चर्चा झाली असल्याचे अजित पवार यांनी सांगितले आहे. या माध्यमातून अजित पवार यांनी भाजप आमदार सुरेश धस यांनी केलेल्या आरोपाला फेटाळले आहे. खालच्या पातळीवर पक्षाचे कार्यकर्ते काय बोलतात, याला उत्तर देण्यास मी बांधील नाही. मात्र वरिष्ठ पातळीवरील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, जेपी नड्डा यांच्याशी माझी वारंवार चर्चा होत असते. आजही मुख्यमंत्र्यांशी याबाबत माझी चर्चा झाली असल्याचे अजित पवार यांनी सांगितला आहे.

बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा वाल्मीक कराडला अटक करण्यात आली आहे. मात्र आता धनंजय मुंडे यांचा देखील राजीनामा घेण्यात यावा अशी मागणी केली जात आहे. याच संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची देवगिरि बंगल्यावर जाऊन भेट घेतली आहे. अंजली दमानिया यांनी सर्व पुरावे अजित पवारांना दाखवले आहे. सर्व पुरावे बारकाईने बघून अजित पवार यांनी मंगळवारी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेईल, असे अजित पवार यांनी आश्वासन दिले असल्याची माहिती अंजली दमानिया यांनी दिली आहे.

# तिच्यावर अत्याचार कर आणि मारून टाक

**दौंड :** विद्यार्थिनीवर अत्याचार करून तिला जीवे मारण्यासाठी १०० रुपये सुपारी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्यातील दौड येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत २२ जानेवारी रोजी हा प्रकार घडला. पालकांची खोटी स्वाक्षरी केल्याचे शिक्षकांना सांगितल्याचा राग आल्याने विद्यार्थिनीची सुपारी दिल्याची माहिती आहे. ही बाब शिक्षकांना समजल्यानंतरही शाळेची बदनामी होऊ नये, यासाठी शाळा प्रशासनाने हे प्रकरण झाकण्याचा प्रयत्न केला. ही बाब समोर आल्यानंतर मुख्याध्यापकांसह वर्गशिक्षक व शिक्षिका यांच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दौंड येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत एका विद्यार्थ्याने पालकांची खोटी सही केली होती. हे सर्व त्याच वर्गातील एका विद्यार्थिनीने पाहिले. त्यानंतर तिने ही बाब त्या विद्यार्थिनीने वर्ग शिक्षिकेला सांगितली. विद्यार्थीनी वर्ग शिक्षिकेकडे तक्रार केल्यामुळे विद्यार्थ्याने तिच्याबद्दल मनात राग धरला होता. खोट्या सहीची माहिती शिक्षकांना सांगितल्याचा मनात राग धरून संबंधित विद्यार्थ्याने अल्पवयीन विद्यार्थिनीवर आधी बलात्कार करावा नंतर तिची हत्या करावी यासाठी १०० रुपयाची सुपारी दुसऱ्या वर्गातील अल्पवयीन विद्यार्थ्याला दिली

मुलांनी ज्या विद्यार्थ्याला सुपारी दिली, त्यानेच हा सर्व प्रकार अल्पवयीन विद्यार्थिनीला येऊन सांगितला. त्यानंतर त्या विद्यार्थिनीने आपल्या पालकांना याची माहिती दिली. आपल्या मुलीने घडलेला प्रकार सांगितल्यानंतर वडिलांनी शाळेत जाऊन वर्गशिक्षक, सुपर वायझरसह मुख्याध्यापकांकडे याबाबत विचारणा केली. मात्र, शाळा प्रशासनाने त्यांना योग्य तो प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर मुलीच्या वडिलांनी थेट दौंड पोलिस ठाण्यात धाव घेत शाळा प्रशासनाविरोधात फिर्याद दिली.

शाळेचे मुख्याध्यापक आणि दोन शिक्षकांनी शाळेची बदनामी होऊ नये म्हणून हा धक्कादायक प्रकार दडपण्याचा प्रयत्न केला. तसेच अल्पवयीन विद्यार्थिनीनेच मुलाची बदनामी करण्याच्या हेतुने सुपारी दिल्याचे सांगत तिला मानसिक त्रास देत तिचे शैक्षणिक नुकसान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून मुख्याध्यापक, वर्गशिक्षक आणि शिक्षिका अशा तिघांवर दौंड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस करत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून पुणे शहर आणि ग्रामीण भागात गुन्हेगारी घडण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सातत्याने वाढणाऱ्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे सामान्य नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण तयार झाले. काही दिवसांपूर्वी पुण्यातील एका नामांकित कंपनीच्या आवारात एका तरुणाने तरुणीची आर्थिक वादातून दिवसाढवळ्या कोयत्याने वार करून हत्या केल्याचे समोर आले होते. त्यानंतर आता शाळेतील विद्यार्थ्यानेच अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यासाठी १०० रुपयांची सुपारी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जानेवारी २०२५

## बेरडवाडी येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न



बेरडवाडी, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाप्रसंगी नृत्य सादर करताना बालकलाकार

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** बेरडवाड, तालुका उमरगा जिल्हा परिषद शाळेत रविवारी (ता. २६) रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ध्वजारोहण करून या कार्यक्रमाचे उदघाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कांतराव मंडले यांच्या हस्ते करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष रंजितकुमार भोकले, पोलीस पाटील काशीनाथ वासुदेव, उपसरपंच दशरथ मंडले, सुरेश मंडले, चंद्राम मंडले, गांधी वासुदेव, सुभाष यंपाळे, भाग्यश्री वासुदेव, रंगुबाई वासुदेव, सपना मंडले , भीमाबाई मंडले, धोंडूबाई वासुदेव, कन्नय्या भोकले, शिवशंकर मंडले, आशाताई कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका आदिसह नागरिक उपस्थिती होते.

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते, नृत्य आणि नाटके सादर केली. मेरा रंग दे बसंती चोला या गीतावर विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य विशेष आकर्षण ठरले. शहीदांचे बलिदान ज्यामुळे उपस्थित प्रेक्षक भारावून गेले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक अनिल मुडमे, सांस्कृतिक विभाग प्रमुख सुनिल राठोड, सहशिक्षक युवराज चव्हाण, सहशिक्षिका रंजना तांदळे, राधिका मंडले आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन बालाजी भालेराव व सुनिल राठोड तर आभार अनिल मुडमे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता जन गण मन गाऊन करण्यात आली.

## कॅप्टन जोशी स्मारक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येणेगूर, ता. उमरगा येथील कॅप्टन जोशी स्मारक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण श्री परमहंस शिक्षण संस्थेचे सचिव बी. ए. बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेदेवराज बिराजदार, मुख्याध्यापक महेश हरके, संचालक शंकर हुळमजगे, संचालिका लक्ष्मीबाई लामजने, इराप्पा लामजने, कल्पना बिराजदार, साई बिराजदार, अमोल बिराजदार, धनश्री पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शालेय वार्तांकन २०२५ या पुस्तकाचे व ४५ वे प्रसाद हस्तलिखित अंकाचे प्रकाशन करण्यात आले. माध्यमिक व उच्च माध्यमिक मार्च २०२४ परीक्षेत गुणानुक्रमे आलेले विद्यार्थी शुभम व्हनाळे, धानेश्वरी पाटील, अनुराधा घोरपडे, संमती पोतदार व उच्च माध्यमिक परीक्षेत धानम्मा बिराजदार, सुजाता मुगळे, अस्मिता म्हमाने या विद्यार्थ्यांचा रोख स्वरूपाचे बक्षीस देऊन सत्कार करण्यात आले. प्रशालेत प्रजासत्ताक दिनानिमित्त वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विशेष क्रमांक मिळाल्याबद्दल श्रद्धा कांबळे हीचा सत्कार करण्यात आले.

संचालक आनंदराज बिराजदार, महेश खंडाळकर, व्यंकट बिराजदार, सौरभ उटगे, चंद्रकांत बिराजदार, अविनाश दुनगे, गोविंद मेडेबणे, प्रवीण स्वामी, प्रा. सुरेश जाधव, प्रा. महादेव बिराजदार, कोमल कीर्तने, पार्वती जगताप, कालिंदी भाले, आम्रपाली गायकवाड, शिवकन्या पांचाळ, गणेश जोजन, अप्पू मुदकण्णा, प्रदीप शिंदे आदरणीय पुढाकार घेतला. प्रस्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख गोपाळ गेडाम तर आभार चंद्रकांत बिराजदार यांनी मानले. शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी वृद्ध, विद्यार्थी-विद्यार्थिनी चे अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## भारतीयांच्या अज्ञानामुळे हजारो वर्ष परकीयांचे राज्य : डॉ. बाळासाहेब लिहिणार



**छत्रपती संभाजीनगर :** लोकसेवा कला व विज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयाच्या वतीने आज गांधीली गावामध्ये राष्ट्रीय सेवा कार्यक्रम योजना अंतर्गत डॉ बाळासाहेब लिहिणार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. भारत देशावर हजारो परकीयांनी राज्य केले याचे मूळ कारण भारतीय माणूस हा पूर्णतः अंधश्रद्धेमध्ये गुरफटला गेला होता ,त्यामुळे या देशावर फ्रेंच, डस, पोर्तुगीज, मोगल आणि शेवटी शेवटी इंग्रज यांनी आपल्या बुद्धीच्या बळावर राज्य केले. माणसांच्या गुलामीचं कारण त्यांचं अज्ञान आहे आणि हेच नेमकं भारतीयांकडे अधिक होतं, येथील शोषित पीडित माणसांना समाजव्यवस्थेने शिक्षणापासून वंचित ठेवल्यामुळे इथला माणूस अज्ञान राहिला आणि हेच परकीयांनी हेरले व हजारो वर्ष राज्य केलं अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. योगिता देवगिरीकर याही उपस्थित होत्या त्यांनी मोबाईल मुळे विद्यार्थी पालकांसोबत, नात्यांसोबत बोलताना कमी दिसत आहे, नातेसंबंधाला यामुळे खिळ बसत आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली. यंत्र युगाचा अधिक वापर होत असल्यामुळे मुलं भावनासुन्य होत आहेत, यांत्रिक होत आहे अशी भूमिका त्यांनी मांडली. महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. गजानन जाधव यांनी अध्यक्षीय समारोप केला.तर डॉ. काकडे यांनी आभार मानले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष पदी प्रकाश गाडेकर कायम



**कन्नड (अरुण थोरात):** राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष यांनी काही दिवसापूर्वी तालुक्यातील कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता, व कोणतेही कल्पना न देता दुसऱ्या पदाधिकाऱ्याची तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती बाबत पत्र दिल्याचे बोलले जात होते. हे पत्र प्रसिद्ध होताच प्रकाश गाडेकर यांनी याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे याबाबत दाद मागितली होती. अजित पवारांनी याची दखल घेऊन प्रकाश गाडेकर यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी नियुक्ती कायम ठेवण्याचे आदेश दिले. प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे यांनी त्याची अंमलबजावणी करत तात्काळ पत्र काढून जिल्हा कार्यकारणीला निर्देश दिले. नियुक्ती कायम ठेवल्याने जिल्ह्यातील पदाधिकार्यांनी प्रकाश गाडेकर यांचे अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जानेवारी २०२५


## तिसरे फुले-शाहू-आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. सुकुमार कांबळे

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने दि. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी तिसरे फुले-शाहू-आंबेडकरी साहित्य संमेलनाचे आयोजन छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. सुकुमार कांबळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने पहिले फुले-शाहू-आंबेडकरी साहित्य संमेलन सप्टेंबर २०२३ रोजी डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले होते. तर दुसरे फुले-शाहू-आंबेडकरी साहित्य संमेलन १ जानेवारी २०२४ रोजी उपराकार लक्ष्मण माने यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. तर पहिले फुले-शाहू-आंबेडकरी विश्व साहित्य संमेलन बँकॉक थायलंड येथे ७ जानेवारी २०२५ रोजी डॉ. ऋषीकेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले.

तरी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे फुले-शाहू-आंबेडकरी साहित्य संमेलन दि. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. या संमेलनाचे उद्घाटन डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे डॉ. श्रीधर नांदेडकर, विलास शिंदगीकर हे राहतील, या संमेलनामध्ये 'भारतीय संविधानव वर्तमान संदर्भ' या विषयावरील परिसंवादाचे अध्यक्ष ॲड. विष्णू ढोबळे हे राहणार आहेत. तर परिवर्तनवादी साहित्य भाषा आणि संस्कृती या परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश मोगले हे राहणार आहेत. या संमेलनामध्ये 'रमाई' एकपात्री नाट्यप्रयोग सिनेअभिनेत्री प्रतिभा आहेर या सादर करणार आहेत. आंबेडकरी जलसा या संमेलनात सादर करण्यात येणार आहे. संमेलनातील कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान डॉ. प्रतिभा अहिरे या भूषविणार आहेत. संमेलनाच्या समारोप सत्रात डॉ. वासुदेव मुलाटे यांच्या हस्ते लाला चव्हाण, कमलाकर गंगावणे यांचा सन्मान करण्यात येणार असून प्रमुख उपस्थिती डॉ. दासू वैद्य, बापूसाहेब सोनवणे यांची राहणार आहे. असे परिषदेच्या वतीने डॉ. मोहन सौंदर्य, अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद यांनी कळविले आहे.

यावेळी परिषदेचे मार्गदर्शक डॉ. ऋषीकेश कांबळे, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. युवराज धबडगे, डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. मिलिंद वाव्हळे, डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. शिवाजी डोळसे, डॉ. सुधाकर नवसागर, डॉ. राहुल म्हस्के, डॉ. हसन इनामदार, डॉ. प्रशांत वनंजे, डॉ. रेखा वाघ, डॉ. अरुण कोळी, डॉ. योगिता देवगिरीकर, डॉ. दिलीप वाघ, डॉ. दैवत सावंत, डॉ. मधुकर वाकळे, डॉ. वाय. ई. भालेराव, डॉ. प्रकाश सुरवसे, डॉ. अण्णासाहेब सोनवणे, डॉ. यजुवेन्द्र वनकर, विजय इनकर यांची उपस्थिती होती.

## सृजनशीलता व अभिव्यक्तीची सवयच मराठी भाषेची अभिजातता संवर्धित करेल - डॉ. अलका नाथ्रेकर




**जालना :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे मराठी भाषिकांवर दुहेरी जबाबदारी आलेली आहे. आज भाषेला संवर्धित करण्याबरोबरच भाषेला मिळालेली अभिजातता टिकविणे आवश्यक आहे. त्यासाठी आपली सृजनशीलता व अभिव्यक्तीची सवयच मराठी भाषेची अभिजातता संवर्धित करेल, असे प्रतिपादन डॉ. अलका नाथ्रेकर यांनी केले.येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभाग आणि आयक्यूएसीच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा समारोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारोप समारंभ प्रसंगी डॉ. नाथ्रेकर बोलत होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. तळेकर होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जालन्यातील जेष्ठ साहित्य अभ्यासक व अनुवादक डॉ. अलका नाथ्रेकर या होत्या. यावेळी मंचावर आयक्यूएसी समन्वयक डॉ. वासुदेव उगले यांची विशेष उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ. नाथ्रेकर म्हणाल्या की, इंग्रजी खिडकीतून जग अवश्य पहा पण पाहणारे डोळे भारतीय आणि मन मात्र मराठी असावे. अलीकडच्या काळात प्रत्येकाला करिअर महत्त्वाचे झालेले आहे. करिअरच्या नावाने आपण आपल्या मातृभाषेपासून दूर होता कामा नये. याची खबरदारी मराठी भाषिकांनी घेतली पाहिजे. मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त करून देण्यासाठी अनेक संत, महंत, साहित्यिकांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्या सर्व समृद्ध साहित्यिक परंपरेचा आपल्याला अभिमान असला पाहिजे. आज जगातील आपल्याला शक्य तेवढ्या भाषा अवगत असल्या पाहिजे ही काळाची गरज आहे, मात्र आपण मातृभाषेतून अभिव्यक्त झालं पाहिजे हेही तितकेच प्रासंगिक आहे, असेही त्या यावेळी म्हणाल्या. कोणत्याही भाषेतून अभिव्यक्त होणे हे त्या भाषेसाठी संवर्धनाचे व वृद्धिंगत होण्यासाठी महत्त्वाचे असते. अभिव्यक्तीतूनच योग्य नेतृत्व निर्माण होत असते. अभिव्यक्ती वाचनातून व संवेदनशील मनातून तयार होत असते. यासाठी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक वाचन करावे. प्रत्येक गोष्टीचा संवेदनशीलपणे विचार करून अभिव्यक्तीची सवय लावून घ्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. तळेकर म्हणाले की, भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने विविध उपक्रम आयोजित करता आले उपक्रम हेच भाषा संवर्धन करत असतात. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक सक्रिय सहभाग नोंदवून मराठी भाषेला मिळालेला अभिजात दर्जा सार्थ करावा. विविध कार्यशाळा, व्याख्याने सृजनशील लेखकांच्या पिढ्या घडवीत असतात. विद्यार्थ्यांनी संवेदनशील विचार करणे गरजेचे आहे. संवेदनशील मनच नवनिर्मिती करू शकते. मराठी भाषेला मिळालेला अभिजाततेचा दर्जा टिकविण्याची सर्वस्वी जबाबदारी हे विद्यार्थी वर्गावर आहे. विद्यार्थ्यांनी ही जबाबदारी स्वेच्छेने स्वीकारावी असेही ते यावेळी म्हणाले. प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त करताना डॉ. उगले यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धा व कार्यशाळा यांची प्रासंगिकता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभागाचे डॉ केशव सोळंके यांनी केले तर प्रा. दीक्षा आनंद यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. विद्या पटवारी, प्राध्यापक डॉ.जितेंद्र अहिरराव, प्राध्यापक डॉ. सुधाकर वाघ, प्राध्यापक डॉ. स्वाती महाजन, इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.गणपत वैद्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

## माजी शिक्षणमंत्र्यांनी घेतलेले निर्णय रद्द

**मुंबई :** राज्याचे शिक्षणमंत्री असताना दीपक केसरकर यांनी काही महत्त्वाचे निर्णय घेतले होते. एक राज्य एक गणवेश आणि पुस्तकांना वह्यांची पाने लावण्याचा निर्णय त्यांनी शिक्षणमंत्री असताना घेतला होता. मात्र, हा निर्णय आता सरकारकडून रद्द करण्यात आला आहे. राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा साथापन झाल्यानंतर दीपक केसरकर यांना शिक्षणमंत्री पद मिळाले नाही. दादा भुसे यांच्याकडे शिक्षणमंत्री पद गेले आहे.

सन २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी ते आठवी या वर्गासाठी असलेल्या पाठ्यपुस्तकांना वह्यांची पाने लावण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला होता. मात्र, यंदाच्या वर्षापासून तो निर्णय मागे घेण्यात आल्याने आता विद्यार्थ्यांना वह्याच्या पानांशिवाय पुस्तके मिळणार आहेत.

दीपक केसरकर शिक्षणमंत्री असताना घेण्यात आलेल्या या निर्णयावर शालेय शिक्षण विभागाकडून आढावा घेण्यात आला. यात पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या वह्यांच्या कोऱ्या पानांचा विद्यार्थ्यांकडून शिकविलेल्या घटकांच्या नोंदी घेण्यासाठी अपेक्षेप्रमाणे उपयोग झाल्याचे दिसून आले नाही. तसेच सदर योजनेचा उद्देश हा दप्तराचे ओझे कमी करणे असा होता, परंतु विद्यार्थी पुस्तके व सोबत वह्या देखील घेऊन येत असल्याचे तसेच पाठ्यपुस्तकांमधील कोऱ्या पानांचा शैक्षणिक नोंदी घेण्याकरिता वापर होत नसल्याचे आढळून आले आहे.

तसेच दीपक केसरकर शिक्षणमंत्री असताना एक राज्य एक गणवेश हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, या योजनेत सुसूत्रतेअभावी योजना फसल्याचे सांगत या योजनेतही बदल करण्यात आले असून मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीकडे देण्यात येणार आहे. त्यामुळे, थेट लाभार्थी योजनेअंतर्गत शाळा समितीकडे निधी दिला जाणार असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र सुरू होताच योग्य मापाचे गणवेश मिळणार आहेत.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जानेवारी २०२५


## औषध निर्मितीतील नाविन्यपूर्ण मॉडेलचे पारितोषिक वितरण समारंभ संपन्न



माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी च्या वतीने आयोजित बक्षीस वितरण प्रसंगी डॉ. ज्योती पेठकर, डॉ. सुशील मठपती व प्राध्यापक-प्राध्यापिका व अन्य.

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीकडून प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून औषध निर्मितीतील नाविन्यपूर्ण मॉडेल सादरीकरण पारितोषिक वितरण समारंभ सोमवारी (ता. २७) रोजी पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्रा. डॉ. ज्योती पेठकर, प्रा. पोळकर, माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सुशील मठपती, फार्मसीचे समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र आळंगे, प्रा. रजनंदिनी लिमये, प्रा. सदफअलमास मुजावर, प्रा. प्रियंका काजळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. ज्योती पेठकर म्हणाल्या की, डिजिटल तंत्रज्ञानाच्या काळात औषध निर्मितीमध्ये अमुलाग्र व नाविन्यपूर्ण संशोधन होणे गरजेचे आहे. रुग्णांच्या सोयीसाठी झटपट प्रभावी औषध शोधणे, आयुर्वेद, सिद्ध आणि युनानी औषधांमध्ये आधुनिक विज्ञानाची सांगड घालून नवीन संशोधन केले पाहिजे. औषधनिर्मितीत शाश्वत आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी करावा. औषध निर्मितीतील २८ मॉडेल सादरीकरणातून हर्षदा सूर्यवंशी, औषधांच्या पॅकिंग इंडस्ट्री (प्रथम), नबीलाल जमादार, आकांक्षा इंगळे व सुरज गडवे, फार्मसी औद्योगिक मॉडेल (द्वितीय), सृष्टी शिंदे, रश्मी बायस, महादेव जाधव व पवन थोरात, (तृतीय) क्रमांक पटकावल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

प्रा. सुदीप ढंगे, प्रा. राहुल इंजे, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. अनिल मोरे, प्रा. विवेकानंद चौधरी, प्रा. लखन पवार आदींचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पायल आगरकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विनंती बसवंत बागडे तर आभार यांनी मानले. यावेळी फार्मसी कॉलेजचे प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा - प्रा. डॉ. महेश मोटे




माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित व्याख्यानाप्रसंगी डॉ. महेश मोटे, डॉ. चंद्रकांत बिराजदार, नरसिंग कदम व अन्य.

**मुरूम, ता. उमरगा, ता. २८ (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मराठी भाषेचा प्रसार व तिच्या सांस्कृतिक महत्त्वाची जाणीव युवा पिढीला करून देण्याच्या हेतूने मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा सुरू आहे. युवा पिढीला भाषेचे महत्त्व, अभिमान बाळगणे, साहित्य, कला, संगीत व संस्कृतीचा प्रचार करणे. मराठी भाषेतील लेखन, वाचन, संवाद व शुद्धलेखन कौशल्य विकसित करणे. यासाठी कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर व्हावा. यासाठी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले.

श्री माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित मराठी पदवी-पदव्युत्तर विभाग यांच्यावतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा समारोप प्रसंगी मंगळवारी (ता. २८) रोजी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी प्रा. डॉ. महेश मोटे, भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. नरसिंग कदम उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपप्रसंगी चंद्रकांत बिराजदार म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषेतून विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे, यावर भर देण्यात आला आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना आवडीनिवडीनुसार विषयाची स्वायत्तता दिली आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. नागनाथ बनसोडे यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोमनाथ व्यवहारे तर आभार प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## मोफत वैद्यकीय उपचार योजनांचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड आवश्यक - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छत्रपती संभाजीनगर :** आयुष्मान भारत या कार्डामुळे संलग्नित रुग्णालयात मोफत आरोग्य उपचार सुविधा मिळतात. आता समाजातील सर्वच घटकांना हे आरोग्य संरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यामुळे संदर्भित रुग्णालयांमध्ये मोफत उपचार योजनांचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड आवश्यक असून नागरिकांनी आपले व आपल्या कुटुंबातील सदस्यांचे आयुष्मान कार्ड नोंदणी करुन घ्यावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

आयुष्मान कार्ड योजनेचा आढावा आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी अशोक सिरसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पद्मजा सराफ, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बडे, डॉ महेश लड्डा, डॉ. बाळकृष्ण लांजेवार, डॉ. अर्चना राणे, डॉ. प्रेमलत कराड, डॉ. रवि भोपळे आदी उपस्थित होते. तसेच दुरदृष्य प्रणालीद्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी सहभागी झाले होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, आयुष्मान भारत कार्डवर १३५३ आजारांवर मोफत उपचार दिले जातात. त्यात सर्व वय, आर्थिक उत्पन्न गट अशा सगळ्यांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ५४ रुग्णालयांमध्ये या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. त्यात ४७ संलग्नित खाजगी रुग्णालयांचा समावेश आहे. आरोग्यसंदर्भात समस्या उद्भवल्यास मोफत उपचार उपलब्ध होण्यासाठी आयुष्मान भारत कार्ड काढणे सगळ्यांच्या हिताचे आहे.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, प्रत्येक नागरिकापर्यंत ही योजना पोहोचविण्यासाठी रेशन दुकानदार, आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र अशा ठिकाणी या कार्डची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय विशेष शिबिरे लावून या कार्डची नोंदणी सुविधा नागरिकांना द्यावी.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २९ जानेवारी २०२५


## शिक्षक सेना राज्य सरचिटणीस पदी दिपक पवार यांची नियुक्ती



**कन्नड (अरुण थोरात) :** शिक्षकसेना संघटनेची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून राज्य सरचिटणी पदी दिपक पवार, राज्य उपाध्यक्ष पदी सोमनाथ जगदाळे, राज्य प्रसिद्धी प्रमुख'पदी महेश लबडे तर छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष पदी अमोल एरंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या मुख्य संघटनेत दि. २७ जानेवारी रोजी धर्मवीर आनंद दिघे जयंती दिनी महत्त्वाचे नियुक्ती आदेश शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हस्ते व शिक्षक सेनेचे कार्यकारी अध्यक्ष चिंतामणजी वेखंडे यांच्या उपस्थितीत देण्यात आले. यात शिक्षक सेनेच्या राज्य सरचिटणीस पदी दिपक पवार, राज्य उपाध्यक्ष पदी सोमनाथ जगदाळे, राज्य प्रसिद्धीप्रमुख पदी महेश लबडे तर छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष पदी अमोल एरंडे यांची नियुक्ती करण्यात आली.

तसेच यावेळी ठाणे जिल्हा शिक्षक सेना पदाधिकारी किशोर दिनकर, नंदकुमार पानसरे, दीपक देसले, राजेंद्र लांडगे, नाशिक जिल्ह्यातील शिक्षक सेना पदाधिकारी संजय चव्हाण, बबन चव्हाण, संजय शेवाळे, मिलिंद भामरे, प्रदीप जाधव, बाजीराव अहिरे, दीपक देसले, रायगड जिल्ह्याचे शिक्षक सेना पदाधिकारी रोशन तांडेल, सुभाष राठोड उपस्थित होते. संघटनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, शिवसेना नेते प्रकाश पाटील, शिक्षणमंत्री दादा भुसे, खासदार संदिपान भुमरे, पालकमंत्री संजय शिरसाट, आ. रमेशजी बोरनारे, आ. प्रदीपजी जैस्वाल, आ. संजनाताई जाधव, आ. विलास भुमरे, आमदार अब्दुल सत्तार, जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, भरत राजपूत यांच्या सह कन्नड तालुका शिक्षक सेनेचे कल्याण पवार, विनोद मोरे, गोपाल फिरके, संजय जोशी, एम पी चव्हाण, पी एम पवार, एस के चव्हाण, प्रवीण वाघ, एन ऐ पाटील, तालुका अध्यक्ष दिलीप मगर, ज्ञानेश्वर बिडवे, योगेश मुळे, हिरालाल चिते, आव्हाड, संदेश राठोड आदींनी अभिनंदन करून पुढील संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## विद्यार्थ्यांनी व्यामिश्र संधीचा सदुपयोग करावा - डॉ. डी. पी. चव्हाण



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** मराठी भाषिकांनी आपल्या मनातील न्यूनगंड बाजूला ठेवून मराठी बाजारपेठीय व्यामीश्र व विविध उपलब्ध संधीचा फायदा घेऊन आपल्या आयुष्यात त्याचा सदुपयोग करावा आणि आपले आयुष्य व जीवन उन्नत करावे.तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या अभिवादन अभिजात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा समारोप प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.किसन लोहार हे उपस्थित होते.ते पुढे म्हणाले की,मराठी भाषा ही समृद्ध व प्रचंड श्रीमंत असून आतापर्यंत मराठी साहित्यात वी.स. खांडेकर, वी.दा. करंदीकर, वी.वा. शिरवाडकर आणि भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्काराने गैरवान्यात आले आहे. यातच मराठी भाषेचे मोठेपण लक्ष्यात येते.मराठी भाषा ही जीवनातील सर्वच विषयांना कवेत घेत असून अलक्षित विषयांना स्पर्श करते.विद्यार्थ्यांनी मराठी विज्ञानकथा वाचल्या पाहिजेत.जयंत नारळीकर यांसारखे मराठी भाषिक विज्ञानातील सुरस कथा समृद्ध करण्याचे काम करताहेत हे आपल्याला दुर्लक्षून चालणार नाही.गेल्या १४ते २८जानेवारी दरम्यान श्रीकृष्ण महाविद्यालयात विविध उपक्रमांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला.त्यात परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, शिबिरे, निबंध, काव्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, अंताक्षरी, शब्दकोडी, प्रश्नमंजुषा, पुस्तक परीक्षणे, ट्विटर मोहीम, गोंधळ,कीर्तन आदी विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

मराठी साहित्य आणि संस्कृतीचे संरक्षण,व संगोपन व्हावे यासाठी मराठी विभागाने सतत कर्यतत्पर राहावे अशा आशावाद व्यक्त करून कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. नागसेन कांबळे यांनी अभिजात मराठी भाषा आणि तिचे भाषिक सौंदर्य स्पष्ट करून सांगितले. या अभिवंदन मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु.स्वाती घोडके हिने केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय कुं.वैष्णवी जाधव हिने करून दिला.प्रास्ताविक प्रा.डॉ.मेघना जोशी यांनी केले आणि कार्यक्रमाचे सविस्तर आभारप्रदर्शन मराठी विभागप्रमुख डॉ.आशिया चिस्ती यांनी मांडले. राष्ट्रगितानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## श्रीलंकेच्या नौदलाच्या गोळीबारात ५ भारतीय मच्छिमार जखमी

**कोलंबो :** श्रीलंकेच्या नौदलाने मंगळवारी सकाळी १३ भारतीय मच्छिमारांवर गोळीबार केला. यामध्ये ५ मच्छिमार जखमी झाले. हे सर्वजण डेल्फ्ट आयलंडजवळ मासेमारीसाठी गेले होते. ही बेटे श्रीलंकेच्या ताब्यात आहेत. या मच्छिमारांवर श्रीलंकेतील जाफना टीचिंग हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

गोळीबार गंभीर असल्याचे लक्षात घेऊन भारत सरकारने श्रीलंकेच्या कार्यकारी उच्चायुक्तांना बोलावून या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला. परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी केले आणि सांगितले की, अशा घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत.

भारतीय वाणिज्य दूतावासाच्या अधिकाऱ्यांनी रुग्णालयात जखमी मच्छिमारांची भेट घेतली आणि त्यांची प्रकृती जाणून घेतली. मच्छिमार आणि त्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सर्वतोपरी मदत केली आहे.

कोलंबोमधील भारतीय उच्चायुक्तांनी हे प्रकरण श्रीलंकेच्या परराष्ट्र मंत्रालयाकडे मांडले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, भारत सरकारने नेहमीच मच्छिमारांशी संबंधित समस्या मानवी पद्धतीने हाताळण्यावर भर दिला आहे. यामध्ये उपजीविकेशी निगडीत चिंता लक्षात ठेवण्यात आली आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, बळाचा वापर कोणत्याही परिस्थितीत मान्य होणार नाही. या संदर्भात दोन्ही सरकारांमधील विद्यमान समजूतदारपणाचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

मच्छिमारांचा मुद्दा दोन्ही देशांसाठी वादग्रस्त राहिला आहे. भारत सरकारच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये श्रीलंकेने विक्रमी ५३५ भारतीय मच्छिमारांना अटक केली होती, जी २०२३ मध्ये जवळपास दुप्पट आहे. २९ नोव्हेंबर २०२४ पर्यंत, १४१ भारतीय मच्छिमार श्रीलंकेच्या तुरुंगात होते आणि १९८ ट्रॉलर जप्त करण्यात आले होते.

भारतीय भागात माशांची संख्या सातत्याने कमी होत आहे. अशा स्थितीत मच्छीमार मासेमारीसाठी श्रीलंकेतील बेटांवर (विशेषतः कचाथीवू आणि मन्नारचे आखात) जातात. मात्र, तेथे पोहोचण्याच्या मार्गावर आंतरराष्ट्रीय सागरी सीमा आहे, जी भारतीय मच्छिमारांना पार करावी लागते. ही मर्यादा ओलांडताच श्रीलंकेचे नौदल भारतीय मच्छिमारांना अटक करते.

अल जझीराच्या एका अहवालानुसार, समुद्रातील प्लास्टिकचे वाढते प्रदूषण आणि अनेक दशकांपासून यांत्रिक ट्रॉलरच्या अतिवापरामुळे भारतीय प्रदेशात माशांची संख्या कमी होत आहे. माशांच्या शोधात समुद्रकिनारी फिरणारे ट्रॉलर प्रवाळ खडकांसह माशांचे अधिवास नष्ट करतात. त्यामुळे त्यांच्या गर्भधारणेत समस्या निर्माण होतात.

गेल्या वर्षी तामिळनाडूच्या रामनाथपुरम जिल्ह्यातील मच्छिमारांच्या संघटनेचे अध्यक्ष पी. जेसूराजा म्हणाले होते की, मच्छिमारांना माहित आहे की, मासेमारीसाठी सीमा ओलांडल्यास त्यांना अटक केली जाऊ शकते किंवा मारले जाऊ शकते, तरीही आम्ही ते करतो. मच्छीमार मासे न पकडता परतले तर त्यांचे जगणे कठीण होईल.